नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०१/२०२५ (रविवार) सायंकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण ४०,५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त पोलीस स्टेशन मौदा यांची कारवाई

दिनांक ११/०१/२०२५ रोजी मौदा येथील स्टॉप पोलीस ठाणे मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, भंडारा कडून नागपुरकडे अवैधरीत्या विनापरवाना रेती टिप्पर ट्रक मध्ये लोड करून वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून माथणी टोल प्लॉझा येथे नाकाबंदी केली असता टिप्पर वाहन क्र. MH 34 BZ 2530 यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता सदर वाहनात एकुण अंदाजे १० ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालक आरोपी नामे जागेश्वर बाबुराव मेश्राम वय २९ वर्ष रा देहेगाव ता मोहाडी जि भंडारा यांना ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून टिप्पर वाहन क्र. MH 34 BZ 2530 किंमती अंदाजे ४०,००,०००/— रू. मध्ये १० ब्रास रेती किमती ५०,०००/— रू. असा एकुण ४०,५०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे मौदा येथे अपराध क्र ४०/२०२५ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पोलीस स्टेशन मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर